पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/७७९/२०२०
दिनांक - १४/०८/२०२०

प्रति,


मा..........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक १९/०८/२०२० रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १९/०८/२०२० रोजी दु.०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. कोरोना/२०२०/ प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८५**

**दिनांक - १९/०८/२०२०** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **१९/०८/२०२०** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात ऑनलाईन पध्दतीने **(VIDEO CONFERENCING)** द्वारे आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक २९/०७/२०२० रोजी (दु.२.३० वा), दि.०५/०८/२०२० रोजी (दु.२.१५ वा), व दि.१२/०८/२०२० रोजी (दु.२.०० वा), झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८२) सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक ०५/०८/२०२० रोजी (दु.२.३० वा), व दि.१२/०८/२०२० रोजी (दु.२.१५ वा), झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८३) सभावृत्तांत कायम करणे.

इ) दिनांक १२/०८/२०२० रोजी (दु.२.३० वा), झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८४) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्कालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी M/s.S.D.Biosensor Healthcare Pvt. Ltd., Haryana यांचेकडून शासन निर्णयाच्या अनुषंगाने Standard Q Covid-19 Ag detection Kit – 4000 Kits, 25 Test per Kit (1,00,000 Tests) 12% GST सह म्हणजे प्रति टेस्ट र.रु.४५०/- प्रमाणे अधिक १२% GST र.रु.५४/- असा १ टेस्टकरीता र.रु.५०४/- प्रमाणे थेट पध्दतीने 1,00,000 Tests खरेदी करणेकामी येणा-या एकुण र.रु.५,०४,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी चार लाख फक्त) चे खर्चास तातडीक बाब असलेने M/s.SD Biosensosr Healthcare Pvt. Ltd., Haryana यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण क्रमांक ५(२)(२) नुसार करारनामा न करता ५% अनामत रक्कम घेवून थेट पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातही कोवीड १९ या विषाणु मुळे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. कोवीड १९ या आजारास जागतिक आरोग्य संघटनेने महामारी घोषित केलेले आहे. मनपा स्तरावर कोवीड १९ या विषाणुचे नियंत्रण व प्रतिबंध करणेकामी कार्यवाही चालु आहे. कोवीड १९ च्या संसंर्गजन्य रोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी वैद्यकीय विभागाकडील अंदाजपत्रकातील खालील लेखाशिर्षावर तरतुद अपुरी असुन इतर लेखा शिर्षातुन तरतुद वर्ग करावी लागणार आहे. तरतुद वर्गीकरणाबाबत मा.अति. आयुक्त (१) यांचे समवेत दि.१९/०५/२०२० रोजी आढावा बैठक झालेली आहे.

१. **अस्थायी आस्थापना लेखाशिर्ष:-** वैद्यकीय विभागांतर्गत कोवीड विषाणुवर नियंत्रण व प्रतिबंध करणेकामी विविध रुग्णालये व दवाखान्यांकरिता दरमहा एकत्रीत मानधनावर वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडीकल स्टाफ भरण्याची प्रक्रिया चालु आहे. त्याकरिता अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर जास्त तरतुद आवश्यक आहे.

२. **ठेकेदार पध्दतीने वायसीएमएच व इतर रुग्णांलयांची साफसफाई:-** वैद्यकीय विभागांतर्गत कोवीड बाधीत रुग्णांवर नविन भोसरी रुग्णालय येथे उपचार चालु आहेत. तसेच मोशी व बालेवाडी येथे कोवीड केअर सेंटर, आकुर्डी कोविड केअर सेंटर सद्यस्थितीत कार्यरत आहेत. कोवीड रुग्णसंख्या वाढत असल्याने कोविड केअर सेंटर व रुग्णालयांची संख्या वाढवावी लागणार आहे. तसेच रुबी एल केअर कोविड केअर सेंटरची उभारणी केली जात आहे. सदर ठिकाणी साफसफाई करणे आवश्यक आहे.

३.**जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणे**:- वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने येथे कोवीड १९ विषाणुचे रुग्णांमुळे जैव वैद्यकीय घनकच-या मध्ये वाढ झालेली आहे. सदर घनकच-याची त्वरीत विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

४.**वीजबिले:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने तसेच कोवीड केअर सेंटर येथील वीज बिलातही वाढ झालेली आहे.

५.**महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने तसेच कोवीड केअर सेंटर मधील कोवीड १९ चे संसर्ग बाधीत रुग्ण, विलगीकरण व अलगीकरण कक्षामध्ये ठेवण्यात येणा-या रुग्णांना जेवणाची सोय करण्यात आलेली आहे. त्यासाठी जास्त खर्च अपेक्षीत आहे.

६. **वाहन इंधन कार्यालय:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने तसेच कोवीड केअर सेंटर मध्ये रुग्णांना ने-आण करणेकरीता, तसेच राहते घर व मनपा रुग्णांलय अथवा कोवीड केअर सेंटर व इतर ठिकाणी उपचारासाठी ने-आण करणे आवश्यक

आहे. त्याकरिता मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच कोवीड विषाणुचा प्रार्दुभाव वाढल्यास अजुन वाहनांची आवश्यकता भासणार आहे. त्याकरिता जास्त वाहन इंधन खर्च अपेक्षीत आहे.

७. **खाजगी वाहन भाडे:-** मनपा क्षेत्रातील बेघर, गरीब, निराधार, गरजु नागरीक / विद्यार्थ्यांना जेवणाची सोय व शिधा वाटप करणेकामी वाहन दुरुस्ती कार्यशाळा मार्फत वाहने भाडेतत्वावर घेणेत आलेली आहेत. फिल्ड सर्व्हिलन्स टिम करीता ५० वाहने र.रु.३३००/- या दराने घेणेत आली असुन त्याचा अंदाजे ६ महिन्यांकरीता र.रु.२,९७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच उपलब्ध करुन देण्यात आलेल्या भाडेतत्वावरील रुग्णवाहिका इ. वाहनांचा खर्च वैद्यकीय विभागातील खाजगी वाहन भाडे या लेखाशिर्षातुन करणेत येत आहे. सदर लेखाशिर्षामधील तरतुदीत वाढ करणे अपेक्षीत आहे.

८. **हेल्थ स्मार्ट कार्ड योजना:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने येथे हेल्थ स्मार्ट कार्ड योजना कार्यान्वित केलेली आहे. त्याकरिताही जास्त खर्च अपेक्षीत आहे.

९. **शासकिय योजनांची अंमलबजावणी:-** तसेच कोविड विषाणुवर नियंत्रण व प्रतिबंध करणेकामी शासनाकडील योजनांची अंमलबजावणी करणेकामी खर्च अपेक्षित आहे. त्याकरीता शासकिय योजनांची अंमजबजावणी या लेखाशिर्षावर तरतुद कमी पडत आहे.

उपरोक्त क्र.१ ते १० चे बाबींवर लेखा विभागाकडील परिपत्रक क्र. लेखा/१/कावि/ ३४८/२० दि.११/५/२०२० चे अनुषंगाने मा.अति.आयुक्त (१) यांचे दालनात दि.१९/५/२०२० रोजी कामकाज आढावा बैठक होऊन खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षांवर तरतुद वाढ करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | घट | वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | स्थायी आस्थापना | **58,00,00,000** | 25,20,00,000 | |
| २ | अस्थायी आस्थापना | 7,50,00,000 | - | 5,30,00,000 |
| ३ | ठेकेदार पध्दतीने वायसीएमएच व इतररुग्णांलयांची साफसफाई | 6,50,00,000 | - | 4,50,00,000 |
| ४ | जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणे | 5,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| ५ | वीजबिले | 1,25,00,000 | - | 1,00,00,000 |
| ६. | महात्माफुले जीवनदायी आरोग्य योजना | 30,62,500 | - | 20,00,000 |
| ७. | वाहन इंधन कार्यालय | 6,32,500 | - | 35,00,000 |
| ८. | खाजगी वाहन भाडे | 71,50,000 | - | 8,50,00,000 |
| ९. | हेल्थ स्मार्ट कार्ड योजना | 2,00,00,000 | - | 1,35,00,000 |
| १०. | शासकिय योजनांची अंमलबजावणी | 1,00,00,000 | - | 2,50,00,000 |
| | एकुण | | - | 25,20,00,000 |

तरी, उपरोक्त बाबींचा विचार करता वरील अनु.क्र १ ते १० या लेखाशिर्षांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसुचि ड मधील प्रकरण ७ तरतुद २(१) नुसार वाढ/घट करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid 19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालिन परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यादृष्टीने मनपाच्या वतीने म्हाळुंगे बालेवाडी स्टेडियम, आकुर्डी पिंपरी चिंचवड इंजि. कॉलेज, Balaji Law College, Tathawade, DY Patil College Girls Hostel, Ravet, KSB Chowk-BSNL (Ladies Hostel), Boys Hostel, Moshi व Ladies Hostel - Indrayani Nagar येथे Covid Care Centre (CCC) सुरु करण्यात आलेले असून माहे मे २०२० व माहे जुन २०२० या कालावधीत केलेल्या हाऊसकिंपींग कामाकरीता मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांना किमान वेतन दराने वेतन अधिक केमीकल व साहित्यापोटी याप्रमाणे र.रु.४९,८६,४८२/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख शहाऐंशी हजार चारशे ब्याऐंशी फक्त) चे खर्चास तसेच माहे जुलै २०२० पासून पुढील कालावधीत किमान वेतन दराप्रमाणे अधिक केमीकल व साहित्यापोटी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) मनपाचे फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उभारणेत येणा-या कोवीड-19 सेन्टर करीता विविध प्रकारचे विद्युत साहित्य (सिलींग फॅन, इलेक्ट्रॉनिक स्टेप टाईप रेग्युलेटर व गिझर) खरेदीबाबत ई निविदा क्र.19/2020-21 अन्वये सात निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.सुरज स्विचगेअर यांचे बाब क्र.1 साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.5,72,670/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.6,51,000/- दरापेक्षा -12.03% ने कमी आहेत. तसेच मे.अर्थरॉन टेकनॉलॉजिस यांचे बाब क्र.2 व 3 साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.11,71,485/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.12,64,263/- या दरपेक्षा -7.34% ने कमी आहेत. यानुसार एकुण 1 ते 3 विविध प्रकारचे विद्युत साहित्यांचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.17,44,155/- हे अंदाजपत्रकीय दर एकुण र.रू.19,15,263/- पेक्षा -8.93% ने कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार सदर लघुत्तम निविदाकार यांना तातडीने पुरवठा आदेश निर्गत करून त्यांचेबरोबर करारनामा करणेची कार्यवाही करणेत आलेली असलेने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ई क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रभाग क्र.३, ४, ५ व ७ मधील सार्वजनिक शौचालय व मुतारी यांची दैनंदिन साफसफाई करणेकामी मनपा क्षेत्रातील वाल्मिकी/मेहतर समाजातील सफाई कर्मचारी कुटूंबीयांच्या शासन नोंदणीकृत सहकारी संस्था यांचे अर्ज मागवुन यामध्ये पात्र ठरणा-या संस्थांना थेट पध्दतीने काम देणेबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहिर प्रकटन प्रसिध्द करणेत आले होते,

त्यानुसार या कामाकरीता खालील प्रमाणे संस्था पात्र ठरत आहे.

| अ.क्र. | पात्र संस्थेचे नाव | प्रभाग क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | मे. महषी बाल्मीकी बेरोजगार सेवा संस्था. | 3 | 61,20,500/- |
| 2 | मे. महषी बाल्मीकी बेरोजगार सेवा संस्था. | 4 | 60,26,000/- |
| 3 | मे. दिन महिला आधार रोजगार संस्था. | 5 व 7 | 91,90,199/- |

वरील प्रमाणे अ.क्र.१ ते ३ संस्थांना त्यांचे नावासमोरील प्रभागा अंतर्गत सार्वजनिक शौचालय व मुतारी यांची दैनंदिन साफसफाई करणेकामी उपरोक्त नमुद अंदाजपत्रकीय रकमेसह थेट पध्दतीने संस्थेची नेमणुक करणे, याकामी त्यांच्याशी आवश्यक अटी / शर्तीचा करारनामा करणे, कामाचा आदेश देणे तसेच सदर किमान वेतन दराने देय वेतन तसेच राज्य शासनाने किमान वेतन दराच्या विशेष भत्त्यात वाढ केल्यास त्यानुसार अदा करावयाच्या प्रत्यक्ष खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातंर्गत ई निविदा नोटीस क्र.४/२०१७-१८ अन्वये मनपा कार्यक्षेत्रातील ३६ स्मशान/ दफनभूमीत किमान वेतन दराने सुरक्षा काळजीवाहक प्रतिदिन ३ पाळयांमध्ये पुरविणे मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲंड सिस्टीम प्रा.लि. व सैनिक इंटलिजेन्स ॲंड सिक्युरिटी प्रा.लि. यांना समान/विभागून कामकाज वाटप करुन दि.१/४/२०१८ ते दि.३१/३/२०२० या ०२ वर्षे कालावधीसाठी कामाचे आदेश देण्यात आले होते. सदर कामाचा कालावधी दि.३१/३/२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. सदर कामाची नविन निविदा कार्यवाही सुरु असल्याने व कोरोना आजाराची साथ चालू असल्याने नि.नो.क्र.४/२०१७-१८ मधील मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲंड सिस्टीम प्रा.लि. व सैनिक इंटलिजेन्स ॲंड सिक्युरिटी प्रा.लि. यांना दि.१/४/२०२० ते दि.३१/५/२०२० या ०२ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदरची मुदत संपुष्टात आल्याने व नविन निविदेची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याने सदर कामास दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० या ०१ महिना कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व या कामी येणा-या (रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲंड सिस्टीम प्रा. लि. यांचे १० स्मशानभूमीसाठी र.रु.८,१९,५०२/- व सैनिक इंटलिजेन्स ॲंड सिक्युरिटी प्रा.लि. यांचे ०३ स्मशानभूमीसाठी र.रु.२,४५,८५१/-) एकत्रीत अंदाजे र.रु.१०,६५,३५३/- (अक्षरी र.रू.दहा लाख पासष्ठ हजार तीनशे त्रेपन्न फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास या कामासाठी मुदतवाढ देणेस तसेच आवश्यक अटी/ शर्तीचा करारनामा करुन मुदतवाढ कामाचा आदेश देणेस महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय काळभोरनगर येथे आयटीच संस्थेव्दारे इ.८ वी ते १० वी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करणेबाबत मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असुन सदरच्या विद्यालयास व येणा-या सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात अंदाजे खर्च र.रू.६,४६,०००/- (अक्षरी र.रू.सहा लाख शेहेचाळीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड मनपाच्या माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत मराठी माध्यमाच्या १८ माध्यमिक विद्यालये व ऊर्दु माध्यमाची ०६ विद्यालये कार्यरत आहेत. या विद्यालयांमधून गतवर्षी ८६०९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. माध्यमिक विद्यालयाचा इ.१० वी चा सरासरी निकाल विद्यार्थ्यांना देण्यात आलेली बक्षिसे व नैसर्गिक वाढ या तत्वावर विद्यार्थी व तुकडी संख्येत वाढ होत असते. सध्या विद्यार्थी व तुकडी संख्येनुसार काही विषयांचे शिक्षक तसेच सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती इत्यादी कारणास्तव शिक्षक कमी पडत आहेत. यास्तव आवश्यक ते विषयांनिहाय शिक्षक नेमणुका करणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी केलेल्या शिक्षक मागणीस्तव मनपा माध्यमिक विद्यालयातील इ.८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून मानधनावर शिक्षक नेमणे क्रमप्राप्त आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या कामगार कल्याण विभागाच्या आदेश क्र.काक/०३/कावि/१५४/२०१८ दि.२८/०६/२०१८ च्या आदेशान्वये कुशल कामगार यांना रक्कम रूपये १७,५००/- ( अक्षरी सतरा हजार पाचशे रूपये फक्त ) मानधन नमुद करणेत आलेले आहे. तथापी शिक्षक ही सज्ञा कामगार या सज्ञेत बसत नाही, असे शेरांकन गतवर्षी कामगार कल्याण विभागाने दिलेले आहे. परंतु सध्याची महागाई इ.बाबी तसेच शिक्षक पदासाठी त्यांची असणारी शैक्षणिक अर्हता पाहुन तसेच विद्यालयात शिक्षक टिकुण राहणे याकरीता सदर रक्कम रूपये १७,५००/- ही एकत्रित रक्कम मानधन म्हणून देणे योग्य होईल मानधनाव्यतीरिक्त अन्य दुसरा कोणताही आर्थीक लाभ देय राहणार नाही. (उदा.दिवाळी सानुग्रह अनुदान) कोरोना-covid -19 या संसर्गजन्य रोगामुळे मनपाची माध्यमिक विद्यालये कधी सुरू होतील हे सांगता येत नाही, परंतु विद्यालयातील विद्यार्थ्यांची पटसंख्या तसेच विद्यालयाच्या मागणीनुसार शिक्षक नेमणे कामी मान्यता घेऊन ठेवणे ऊचित होईल,म्हणजे शाळा सुरू झाल्याच्या पहिल्या दिवसापासुन विद्यार्थ्यांना शिक्षक उपलब्ध होऊ शकतील त्याकरीता सद्य स्थितीत जाहीरात प्रसिध्द करून उमेदवारांचे अर्ज घेऊन गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करून सदर यादीस मान्यता घेऊन ठेवणे योग्य होईल म्हणजे अल्प शैक्षणिक कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. तसेच सद्य:परिस्थिती लक्षात घेता संपुर्ण राज्यामध्ये लॉकडाउन परिस्थीती असुन प्रवासाची व निवासाची कोणतीही साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे मानधनावरील शिक्षक भरती करीता स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करणेबाबत मान्यता मिळावी. पिंपरी चिंचवड मनपा माध्यमिक विभागामध्ये मराठी

माध्यमा करिता -८५ व ऊर्दु माध्यम-२२ शिक्षक असे एकुण – १०७ शिक्षक नेमणुकीसाठी शिक्षकांना मासीक एकत्रित मानधन र.रू.१७,५००/- (अक्षरी र.रू.सतरा हजार पाचशे फक्त) प्रमाणे मासीक १०७ शिक्षकांना र.रु.१८,७२,५००/- (अक्षरी र.रू.अठरा लाख बाहत्तर हजार पाचशे फक्त) मासिक खर्च येणार आहे. या प्रमाणे ०६ महीन्याचा एकुण खर्च र.रू.१,१२,३५,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी बारा लाख पस्तीस हजार फक्त) सदरचा खर्च विद्यालये चालु झाल्यानंतर शिक्षक नेमणूका करणेत येणार असुन नेमणूक आदेशाच्या तारखेरपासुन सहा महीण्याच्या कालावधीकरीता होणार आहे. र.रू.१,१२,३५,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी बारा लाख पस्तीस हजार फक्त) या अपेक्षित खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच मनपाच्या वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करून स्थनिक उमेदवारांना प्राधान्याने देऊन शिक्षक नेमणूक करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा विभागास आवश्यक SKY WALKER ओपन जिम साहित्य खरेदीकामी Government e marketplace वर प्रसिद्ध केलेली निविदा क्रमांक GEM/2020/B/505567 नुसार 02 पात्र निविदाकारांपैकी प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.हनी फन एन थ्रिल कं. यांचे बाब क्र.01 याप्रमाणे एकुण 01 बाबी साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर र.रू.95,63,700/- हे दर अंदाजपत्रकीय दर र.रू.1,01,72,951/- पेक्षा -5.99% ने कमी असल्याने सदर दर स्विकृती करणेत आलेले असून सदर प्राप्त लघुत्तम दर एकूण र.रू.95,63,700/- (अक्षरी र.रू.पच्याणाव लाख त्रेसष्ठ हजार सातशे फक्त) चे खर्चास व सदर लघुत्तम निविदाकार मे.हनी फन एन थ्रिल कं. यांचेबरोबर करारनामा करुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१०) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दि.14/03/2020 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, कलम 41 व 50 नुसार व महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63 (6) व कलम 67(3) (क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना वकोरोना या साथरोगाची आपत्तकालीन परिस्थितीमध्ये शहरातील नागरीकांना अति तातडीने वैद्यकिय उपचार करण्यासाठी Inspired o2 FLO-High Flow Nasal Oxygen Therapy Equipment थेट पध्दतीने मे.स्मिथ मेडीकल इंडीया, प्रा.लि. या उत्पादीत कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.ड्रग हाउस,पुणे यांचे कडुन एकुण 130 नग प्रतिनग र.रू.2,50,000/- अधिक 12 टक्के जी.एस.टी. याप्रमाणे खरेदी करणेकामी येणारे र.रूपये 3,25,00,000/- (अक्षरी र.रू.तीन कोटी पंचवीस लाख फक्त) अधिक 12 टक्के जी.एस.टी.) चे खर्चास महानगरपालिका अधिनियमअनुसुची प्रकरण 5(2)(2) नुसार मा.स्थायी समितीची

कार्योत्तर मान्यता व मे.ड्रग हाउस पुणे यांचेबरोबर कार्यात्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) ``कोरोना विषाणू COVID-19`` चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कामकाजासाठी QUARANTINE (अलगीकरण) ठिकाणी नियुक्त होमगार्ड यांचे मानधन (कर्तव्यभत्ता) अदायगीकामी अतिक्रमण निर्मुलन व्यवस्था खर्च या लेखाशिर्षावर पुरेसी तरतुद शिल्लक नसलेने बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन विभागाकडील स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली र.रु.१८,००,००,०००/- मधून र.रु.३,००,००,०००/- इतकी रक्कम घट करुन अतिक्रमण निर्मुलन व्यवस्था खर्च या लेखाशिर्षावर र.रु.३,००,००,०००/- इतकी वाढ करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१२) ``कोरोना विषाणू COVID-19`` चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कामकाजासाठी QUARANTINE (अलगीकरण) कामकाजासाठी जिल्हा समादेशक होमगार्ड, पुणे जिल्हा यांचे कार्यालयामार्फत पुरविणेत आलेले २२० होमगार्डस प्रती दिन प्रती होमगार्ड ६७०/- प्रमाणे दिनांक २३/०३/२०२० ते २१/०४/२०२० तसेच २२० होमगार्डस प्रती दिन प्रती होमगार्ड ९८८.२५ प्रमाणे दिनांक २३/०४/२०२० ते २२/०८/२०२० पर्यंत होमगार्डस मानधन (कर्तव्यभत्ता) अदा करणेत आलेली र.रु.३,११,७५,५९५/- (अक्षरी र.रु.तीन कोटी अकरा लाख पंच्याहत्तर हजार पाचशे पंच्याण्णव फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता तसेच कोरोना विषाणू तीव्र संसर्गजन्य स्वरुपाचा आजार असल्याने कोरोना प्रादुर्भाव आटोक्यात येईपर्यंत QUARANTINE (अलगीकरण) कामकाजासाठी होमगार्ड मनुष्यबळ कायम ठेवणे आवश्यक असलेने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत वॉर्ड क्र.२० मधील कासारवाडी येथील नवीन शाळा इमारतीचे काम पुर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात आहे. सदर शाळा इमारतीचा वापर करणेकामी अतिरिक्त विजभार मंजूर करुन विजपुरवठा करणे आवश्यक आहे. त्याकरिता इकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/१३४/२०२०, दि.१३.०६.२०२० अन्वये म.रा.वि.वि.कं.लि.यांना कळविले असता, त्यांचेकडील कोटेशन क्र.EE/PCD/L.T.SPL/LSO/ADDL.LOAD/04/2020-21/1276 दि.२९.०७.२०२० अन्वये कोटेशन प्राप्त झाले आहे. त्यामध्ये एकूण र.रु.७८,४९०/- रक्कम कळविली आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांचे नावे शुल्क र.रु.७८,४९०/- (अक्षरी र.रू.अठ्याहत्तर हजार चारशे नव्वद फक्त) मनपाने अदा करणे आवश्यक आहे. सदरील शुल्क अदा केलेनंतर अतिरिक्त वीजभार व नवीन वीजमीटर म.रा.वि.वि.कं.लि. यांचे कडुन उपलब्ध होणार आहे. तरी सदर रक्कम म.रा.वि.वि. कंपनीस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४) प्रभाग क्र.१० मध्ये महात्मा फुले पुतळा आ.क्र.९७ स.नं.१५५ वर अस्तित्वात असून सदर ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारणेची मागणी जन सामान्य नागरीकातून तसेच स्थानिक नगरसदस्य यांचेमार्फत सतत होत आहे. सदर ठिकाणी सावित्रीबाई फुले यांचे स्मारक केलेस महिला वर्गात एक प्रकारचे प्रेरणास्थान प्राप्त होईल. सदर प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण असले कारणाने नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिद्ध करणेतसेचनिविदापुर्वव निविदा पश्चात ही सर्व कामे करणेसाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. सदर बाबत मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर सल्लागार यांच्याकडून दरपत्रक मागविण्यासाठी दि.१७/०६/२०२० रोजी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेत आली होती. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत दि. १९/०६/२०२० रोजी दु.३.०० पर्यंत एकूण ०३ सीलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत. सदर कोटेशन दि. १९/०६/२०२० रोजी दु.३.०० वाजता उघडण्यात आले असून सदर तक्यानुसार मे.सृष्टी डिझायनर यांनी लघुत्तम दर १.९९% (जीएसटी सोडून) सादर केलेला आहे. तरी मे.सृष्टी डिझायनर यांनी लघुत्तम दर सादर केल्याने त्यांची सदर कामाच्या निविदा पूर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस हरकत वाटत नाही. सबब प्रभाग क्र. १० मध्ये महात्मा फुले स्मारक परिसरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृतीपुतळा उभारणे या कामासाठी मे.सृष्टी डिझायनर यांची लघुत्तम दर १.९९% नुसार निविदा पूर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस व त्याकामी येणारी फी १.९९% (जीएसटी सोडून) अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड लिंक रोड येथील विद्युत दाहिनीकरिता आणखी एक नविन दाहिनी (Furness) बसविणेत आलेली आहे. सदर नव्याने बसविलेल्या विद्युत दाहिनीमुळे वीजभार वाढणार आहे. त्यामुळे वाढीव वीजभाराकरिता आवश्यक सुरक्षाठेव रक्कम व इतर शुल्क म.रा.वि.वि.कं.लि.स अदा करणे आवश्यक आहे. सदर विद्युत दाहिनीचा सद्याचा मंजूर वीजभार ५६.२५ KVA असुन तितकाच ५६.२५ KVA वाढीव वीज भारासह एकूण ११२.५ KVA मंजूरीकामी म.रा.वि.वि कंपनीकडे इकडील पत्र क्र.अक्षे/वि/ /२०२० दि.२०.०७.२०२० नुसार विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज सादर केला असता, म.रा.वि.वि.कं.लि.यांनी त्यांचे पत्र क्र.EE/PCD/T/L.TSPL/LSO/ ADDL.LOAD/03/2020-21/1218 दि.29.07.2020 नुसार र.रु.५७,३३४/- अदा करणे आवश्यक आहे. तरी नव्याने बसविलेल्या विद्युत दाहिनीकरिता वाढीव वीजपुरवठा करणेकरिता म.रा.वि.वि.कं.लि. यांना र.रु.५७,३३४/- (अक्षरी र.रु.सत्तावन्न हजार तिनशे चौतीस फक्त) अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका मधील स्थानिक संस्था कर विभागातील वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावर सन २०२०-२१ साठी र.रु.१,००,०००/- तरतुद करणेत आली आहे. स्थानिक संस्था कर विभागाकडील मा.सहा.आयुक्त यांचेकडे बालेवाडी कोविड केअर सेंटर कामकाजासाठी नेमणुक केलेली आहे. सदर कामकाजासाठी त्यांना आदेश क्र.जा.क.कागा/३/२४८/२०२० दि.१/६/२०२० अन्वये त्यांना बालेवाडी कामकाजासाठी गाडी देण्यात आली असून सदर गाडीचा वाहन इंधन खर्च हा स्थानिक संस्था कर विभागा मार्फत करण्यात यावा असे कार्यशाळा विभागाने कळविले आहे. त्यामुळे वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावरील तरतूद अपुरी पडत आहे. तथापि माहे जुन २०२० अखेर र.रु.६०,०००/- इतका खर्च झालेला असून र.रु.४०,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. स्थानिक संस्था कर विभागाकडील सन २०२०-२१ स्थायी अस्थापना लेखाशिर्षावर र.रु.४,०२,९६,०४७/- इतकी तरतुद शिल्लक असून स्थायी अस्थापना या लेखाशिर्षामधून वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन लाख फक्त ) वर्ग करावयाचे झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षामधून दुसऱ्या अर्थसंकल्पी शिर्षामध्ये वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असलेने स्थायी अस्थापना या लेखाशिर्षामधून वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु तीन लाख रुपये) वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१७) मे.समीर एन्टरप्रायझेस यांचेकडून र.रू.1,73,729/- अधिक 18% GST ची रक्कम रू.31,271/- अशी एकूण र.रू.2,05,000/- (अक्षरी र.रु.दोन लाख पाच हजार फक्त) एवढी रक्कम मनपा कोषागारात भरून घेऊन दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग शाळा इमारत (भाग-१) पाडून, या इमारतीमधून प्राप्त होणारे राडा-रोडा, स्ट्रक्चरल स्टील, लोखंड, दरवाजा, खिडक्या, क्रॉक्रीट, वीटा, फरशी, लोखंडी ग्रील, लोखंडी रेलींग, पत्रे, लाकूड, विद्युत वायरींग, विद्युत बटणे व इतर न काढता येणारे साहित्य, इमारत पाडणारे ठेकेदार मे.समीर एन्टरप्रायझेस यांना निविदेच्या विहित अटीनुसार इमारत पाडून, या इमारतीमधील साहित्य देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१८) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.16/1/2019-20 अन्वये अशुध्द जलउपसा केंद्र रावेत पंपगृहांतर्गत प्रतिदिन १०० द.ल.लि. जलउपसा क्षमता वाढविणेचे दृष्टीने पंपिंग मशिनरीची उभारणी करणे आणि आनुषंगिक कामे करणेकामी मे.फ्लोमोर लिमिटेड नि.र.रू.15,02,28,159/- (अक्षरी र.रू.पंधरा कोटी दोन लाख अठ्ठावीस हजार एकशे एकोणसाठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.15,02,28,159/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.15,02,28,159/- पेक्षा 17.18% कमी म्हणजेच

र.रु.12,44,18,961/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.12,44,18,961/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१९) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०६.०७.२०२० ते दि.१२.०७.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/६३/२०२०, दि. १४/०८/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेबाबत.

विषय क्र.२०) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपुर्ण देशामध्ये असलेने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीमध्ये सर्व प्राथमिक शाळा बंद आहेत व शालेय शिक्षण ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. सदरचे काळामध्ये विद्यार्थांना शालेय साहित्य देता आले नाही तथापि नजीकचे काळामध्ये प्राथमिक शाळा सुरु होणार असल्याचे गृहीत धरुन शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य गतवर्षाचे पुरवठाधारक यांचेकडून गतवर्षाचे दराने खरेदी समितीचे शिफारसीनुसार सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी पुर्नप्रत्ययी आदेशास मा.खरेदी समिती व मा.आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच मा.शिक्षण समिती यांचे मागणीप्रमाणे सद्यस्थितीमध्ये कोरोना साथरोगामुळे शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी यापुर्वी मागणी केलेली होती.त्यानुसार खालीलप्रमाणे शालेय साहित्य वाटपाकामी येणा-या खर्च विषयास - बालवाडी व इ.१ ली ते ८ वी मधील सर्व शालेय विद्यार्थांकरीता शालेय प्रयोगवही, चित्रकला वही व भूगोल नकाशावही व विविध अभ्यासपूरक पुस्तकांचे पुरवठाधारक मे.कौसल्या पब्लिकेशन यांचेमार्फत शाळानिहाय शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारक | तपशिल | होणारा अंदाजित खर्च र.रु |
|---|---|---|---|
| १ | मे.कौसल्या पब्लिकेशन | चित्रकला वही, भूगोल नकाशावही व प्रयोग वही | २१,४३,३६७/- |
| २ | मे.कौसल्या पब्लिकेशन | विविध अभ्यासपुरक पुस्तके | ९०,३७,३४८/- |
| | | एकुण र.रु | १,११,८०,७१५/- |

तरी अ.क्र.१ वरील खर्च लेखाशिर्ष - सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता व विकास वरील उपलब्ध तरतूद र.रु.२,००,००,०००/- व अ.क्र.२ वरील खर्च लेखाशिर्ष - व्यवसायमाला व स्वाध्यायमाला उपलब्ध तरतूद र.रु.१,००,००,०००/- या तरतूदीमधुन येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२१) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपुर्ण देशामध्ये असलेने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीमध्ये सर्व प्राथमिक शाळा बंद आहेत व शालेय शिक्षण ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत.सदरचे काळामध्ये विद्यार्थांना शालेय साहित्य देता आले नाही तथापि नजीकचे काळामध्ये प्राथमिक शाळा सुरु होणार असल्याचे गृहीत धरुन शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य गतवर्षाचे पुरवठाधारक यांचेकडून गतवर्षाचे दराने मा.खरेदी समितीचे शिफारसीनुसार सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी पुर्नप्रत्ययी आदेशास मा.खरेदी समिती व मा.आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच मा.शिक्षण समिती यांचे मागणीप्रमाणे सद्यस्थितीमध्ये कोरोना साथरोगामुळे शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी यापुर्वी मागणी केलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शालेय साहित्य वाटपाकामी येणा-या खर्च विषयास - इ.१ ली ते ८ वी मधील सर्व शालेय विद्यार्थांकरीता शालेय वह्या चे पुरवठाधारक मे.सनराज प्रिंटपॅक इंडस्ट्रीज यांचेमार्फत शाळानिहाय शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारक | तपशिल | होणारा अंदाजित खर्च र.रु |
|---|---|---|---|
| १ | मे.सनराज प्रिंटपॅक इंडस्ट्रीज | शालेय वह्या | १,३१,४१,७१०/- |
| | | एकुण र.रु | १,३१,४१,७१०/- |

तरी वरील खर्च लेखाशिर्ष - शालेय वह्या वरील उपलब्ध तरतूद र.रु.२,००,००,०००/- या तरतूदीमधुन येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बालाजी विधी महाविद्यालय ताथवडे हे कोविड १९ अलगीकर केंद्र (COVID CARE CENTERE) उभारणी करणेकामी माहे जून २०२० पासून तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात घेणेत आले असून सदर ठिकाणी कोविड १९ पेशंटवर मनपा मार्फत उपचार सुरु आहेत. सदर कामी होणारे वीज खपाचे विजबिल मनपाने मराविविकं मर्यादित यांना अदा करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर ठिकाणचे माहे जून २०२० व जुलै २०२० चे वीजबील र.रु.४,४१,०३०/- मराविविस अदा करणेबाबत बाजाली विधी महाविद्यालय ताथवडे यांनी दि.७/८/२०२० चे पत्रान्वये कळविले असून त्यानुसार सदरचे वीजबील र.रु.४,४१,०३०/- (अक्षरी

र.रु.चार लाख एक्केचाळीस हजार तीस फक्त) मराविविकं मर्यादित पुणे यांना मनपाने अदा करणे क्रमप्राप्त व आवश्यक आहे. सदरचे वीजबील मुख्य कार्यालय मध्यवर्ती भांडार विभागाकडील “कोरोना निधी” या निधीतून अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/७७९/२०२०
दिनांक – १४/०८/२०२०

**टिप** - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.